# प्रकरण पाचवे

## वृध्द शेतक-यांच्या साठी भविष्य निर्वाह निधी :-

### [१] योजनेची गरज :-

गडहिंग्लज तालुक्यातील शेतकरी समाजाचा अभ्यास करीत असतांना वृध्दाप काळातील शेतक-यांची जी असहाय्य अवस्था लक्षात आली त्यावर उपाय म्हणून कांही योजना शक्य आणि आवश्यक वाटतात अर्थात या योजना अभ्यासक्षेत्रातील शेतक-याशी चर्चा करुनच निश्चित केलेले आहे. तसेच या योजनांची मांडणी किंवा हेतू केवळ अभ्यास क्षेत्रा पुरता मर्यादित नांही तर भारतातील ४०० चे वर जिल्ह्यातून असणा-या ४००० च्या वर तालुक्या पैकी एक तालुका या अर्थाने प्रतिनिधीक स्वरुपात संशोधकाने या योजना मांडलेले आहेत.

### [२] शेतकरी हा सर्वात मोठा श्रमिक :-

शेतकरी हा भारतीय समाजातील सर्वात मोठा श्रमिकांचा वर्ग आहे. ६९.३ टक्के श्रमिक या क्षेत्रात आहे. इतर कोणत्याही व्यवसायामध्ये इतक्या प्रचंड संख्येने श्रमिक गुंतलेले नांही. शहरी समाजातील पांढर पेशा नोकर वर्ग किंवा कारखानदारीतील कामगार वर्ग श्रमिक म्हणून मान्यता पावलेले असतात. त्यांचे प्रमाण ३० टक्के च्या दरम्यान आहे. त्यांच्या श्रमातून देशाची

उभारणी होते हे मान्य झालेलेआहे त्यांच्या श्रमाचा मोबदला त्यांना मिळाला पाहिजे हे अमान्य केलेले नांही किंबहुना नागरी समाज रचनेचा फायदा घेवून हे श्रमिकांचे वर्ग जागृत झोलेले आहेत. होत आहेत. आपल्या हक्कासाठी लढू लागलेले आहेत. लढयासाठी आवश्यक शास्त्र म्हणून त्यांनी स्वत:च्या संघटना निर्माण केलेले आहेत केल्या जात आहेत. संघ शक्तीच्या जोरावर आपले हक्क पदरात पाडून घेतलेले आहेत घेतले जात आहे. जेवढे मिळेल तेवढे पदरात घेवून उरलेल्यासाठी लढा देण्याचे त्यांचे धोरण आहे. संघटनेतून निर्माण होणर असलेल्या संघर्ष शक्ती पुढे शासनही नमते धोरण घेवून त्यांना सुविधा प्राप्त करुन देत आहे. त्यांच्या मागण्या बद्दल किंवा त्यांना मिळणा-या सुविधा बद्दल तक्रार करणेचे कारण नांही व्यक्ती आणि व्यक्ती समूह आपल्या हक्कासाठी झगडणार व ते पदरात पाडून घेणार या मध्ये अनैसर्गीक कांहीच नांही पण या सर्वा मधे आम्हाला शेतकरी समाजाचा अभ्यास करीत असतांना जाणवलेली फरकाची विलक्षण दरी आश्चर्यकारक आहे.

(३) शेती क्षेत्रातील श्रमिकांनाही इतरा प्रमाणे सुविधा मिळाव्यात :-

कामगारा प्रमणे किंवा नोकर वर्गा प्रमाणे शेतकरी हा देखील श्रमिक आहे त्याच्या श्रमातून देखील देशाची केवळ बांधणीच नव्हे तर भरण पोषण होत आहे. याची जाणीव फक्त भाषणातच आढळून येते प्रत्यक्षात या जाणीवेचे प्रत्युत्तर नर

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शासकीय धोरणात दिसून येते ना विचारवंताच्या विचारातून आढळून येत शेतकरी किंवा शेतमजूर हा श्रमिक आहे त्याच्या श्रमालाही मूल्य आहे शेती हा देखील व्यवसाय आहे. त्या व्यवसायाला देखील राष्ट्राच्या अर्थ व्यवस्थेत आणि समाज व्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे. त्यातील व्यावसायिकांनाही इतरा प्रमाणे कांही गोष्टींचे संरक्षण हवे याचा विचार शासनानेही फारसा केलेला नांही इतकेच काय पण आश्चर्याची खरी बाब ही आहे की,या गोष्ठी शेती क्षेत्रातील श्रमिकांनांही आकाशातील चंद्राचा स्पर्श करण्या इतक्या अशक्य व कल्पनातीत वाटतात.

शेतकरी समाजालाही महागाई त्रस्त करते त्याच्या जिवनातील गरजांची संख्याही वाढत्या वया बरोबर अशा मेटाकुटीला आलेला शेतक-याला इतर क्षेत्रातील श्रमिका प्रमाणे सुविधा मिळाल्या पाहिजेत " शेतकरी आम्हाला भविष्य निर्वाह निधीची योजना लागू करा " म्हणायला लागले तर आश्चर्य वाटणेचे कारण नांही इतर श्रमिका प्रमाणे आयुष्य भर काबाड कष्ट करणा-या शेतकरी समाजाच्या मनातही स्वत:च्या भविष्य काळा विषयी अनिश्चितता असते असेच या अभ्यासांती जानवते. आपले म्हातारपणी कसे होणार हा प्रश्न शेतक-यांना ही सतत सतावणारा आहे. याची जाणीव अभ्यास करीत असतांना झाली

म्हणूनच शेतकऱ्याशी चर्चा करीत असतांना " भविष्य निर्वाह निधीची " कल्पना त्यांच्या समोर मांडली सुरुवातीला प्रत्येकाला ही योजना अशक्य व कल्पनेपलीकडेच वाटली. पण थोडे स्वरुप स्पष्ट केल्या नंतर मात्र प्रत्येक शेतकऱ्याने ही योजना उचलून धरली इतकेच नव्हे तर कांहींनी विचारलेल्या प्रश्नांना इतकी सुरेख उत्तरे दिली की संशोधकाच्या मनात अंधूक स्वरुपात आलेली ही कल्पना अधिक सुस्पष्ट व व्यवहारी स्वरुपात पुढील प्रमाणे मांडता आली.

योजनेचा आराखडा :-

इतर क्षेत्रातील श्रमिका प्रमाणे शेती क्षेत्रातील श्रमिक किंवा शेतकरी हा देखील वयाच्या २० व्या वर्षा पर्यंत आपला व्यवसाय किंवा धंदा निश्चित करतो असे गृहित धरले तसेच ५५ व्या वर्षा पर्यंतच तो काम करु शकतो त्यानंतर त्याचे शरीर त्याला साथ देत नांही अनेक तक्रारी मुळे शेतीची अवजड कामे तो करु शकत नांही त्यामुळे तो हळू हळू अवजड कामाच्या जबाबदारीतून निवृत्त होतो. हे आढळून आले हेच वय त्याचे निवृत्तीचे वय मानायला हरकत नांही. थकून पुढे तो शेती व्यवसायातून अंशतः निवृत्त होतो अंशतः म्हणण्याचे कारण इतकेच की जर अवजड कामे सोडून गुरे पाळने राखण करणे विणणे कातने वगैरे कामे करु लागतो एखाद्या आजाराने गाठले नांही तर

तो शेवट पर्यंत स्वस्थ बदलूनही हलकी कामे करतो. पण खऱ्या अर्थाने शेतीच्या प्रत्येक कामालातो अपात्र ठरतो असे आढळून आले.

वयाच्या विसाव्या वर्षा पासून पुढे ज्याने शेती हाच व्यवसाय म्हणून निवडला त्याची रितसर इतर व्यावसायीका प्रमाणे नोंदणी व्हावी त्या वर्षा पासून त्या शेतकऱ्याने दर वर्षी १०० रुपये शासनाच्या खजिन्यात आपल्या नांवावर भरत जावे शासनानेही त्या शेतकऱ्याच्या नांवावर दर वर्षी १०० रुपये भरत जावे ही ठेव न परतीची व मध्येच काढता न येणारी असावी नोकर किंवा कामगारांना [ Contributory — Provident fund ] योजना जशी अमलात आणली जाते तसेच या योजनेचे स्वरूप असावे दर वर्षी जमणाऱ्या या रकमेवर ८ टक्के व्याज आकारून त्याचा समावेश दर वर्षी मुदलात मध्ये केला जावा या प्रमाणे शेतकऱ्यांच्या वयाच्या ५५ व्या वर्षा पर्यंत ३५ म्हणजे ३५ वर्षाच्या कालावधीत दर वर्षी शेतकऱ्याचे १०० आणि शासनाचे १०० अशी २०० रुपयाची व त्याच्या व्याजाची भर पडतच जाईल शेवटच्या वर्षा पर्यंत शेतकऱ्यांची मुद्दल ३५०० रुपये व शासनाची ३५०० रुपये इतकी होईल या एकूण ७००० रुपयावर फक्त ८ टक्के आकारलेले व्याज मात्र ३३,६६२-७६ रुपये होईल याचा अर्थ वयाच्या ५५ व्या वर्षी किंवा योजना सुरू झाल्या पासून ३५ वर्षाच्या कालावधीत एकूण रक्कम ४०६६२-७६ रुपये होईल ती जशी त्या तशी त्या

शेतक-याला देण्यात यावी जशी इतर नोकर किंवा कामगारांना नोकरी सोडतांना किंवा सेवा निवृत्तीच्या वेळी दिली जाते या योजनेचे कोष्टक पुढील प्रमाणे.

| व्यक्तीचे वय[वर्षे] | योजनेचा काळ[वर्षे] | व्यक्तीने भरावयाची रक्कम रुपये | शासनाने भरावयाची रक्कम रुपये | एकूण रक्कम रुपये | ८ टक्के प्रमाणे चक्रवाढ व्याजाची रक्कम रुपये | चक्रवाढ व्याजासह मिळणारी एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | १ | १०० | १०० | २०० | १६ | २१६ |
| ३० | १० | १००० | १००० | २००० | ११७९.२८ | ३१७९.५ |
| ४० | २० | २००० | २००० | ४००० | ५९८०.२८ | ९९८०.२८ |
| ५० | ३० | ३००० | ३००० | ६००० | २११२४.५६ | २७१२४.५६ |
| ५५ | ३५ | ३५०० | ३५०० | ७००० | ३३६६२.७६ | ४०६६२.७६ |

स्पष्टीकरणाच्या सोयीसाठी विस्तार टाळण्यासाठी प्रत्येक दशकात किंवा दहा वर्षांच्या कालावधीत निर्वाह निधी कसा भर पडेल याची वरील कोष्टकात मांडणी केलेली आहे.

[३] <u>योजनेची व्यवहार्यता</u> :-

[१] ही योजना शेतक-यांना लागू करता येत नांही असा

सुरुवातीला गैर समज होण्याची शक्यता आहे. त्याच्या संभाव्य कारणा पैकी एक म्हणजे १०० रुपये वर्षाला भरणारे शेतकरी व शेतमजूर मिळणार नांहीत. योजना तशी फायद्याचर आहे कारण स्वत: १०० रु. भरल्या नंतर शासनाचे १०० रुपये मिळतात त्यामुळे आपल्या नकळत होणाऱ्या बचतीतून फार मोठी रक्कम शेवटी मिळते म्हणून श्रीमंत शेतकरी याचा जास्तीत जास्त फायदा घेतील परंतु या शंकेला फारसा अर्थ नांही गरीब शेतकरी व कामगारांना वर्षाला एकदम रक्कम भरता येत नसेल तर तुम्ही काय कराल ? असा प्रश्न विचारला असता " आम्ही महिन्याला आठ रुपये भरु असे त्यांनी सांगीतले महिना आठ रुपये तरी कसे भराल ? " असा प्रश्न भूमीहीन शेतमजूराला विचारला असता " एक कोंबडी घेवून बाळगली तर ती महिन्याला निदान १६ अंडी देते याचा अर्थ ८ ते १० रुपये एका कोंबडीच्या उत्पन्नातून आम्ही भरु " असे त्यांनी सांगीतले कांही जनानी शेळी किंवा बकरी घेवून बाळू वर्षाला एक पिले तयार झाले तरी त्यांची बाजारात आज किंमत २०० रुपयाच्या पुढे आहे. नवरा बायकोची फंडाची २०० रुपये वार्षीक वर्गणी या मार्गानी भरु असे सांगीतले म्हैशी पाळणाऱ्या शेतकऱ्यांनी दुधाच्या बिलातून डेअरी संस्थेकडून परस्पर महिन्याला आठ रुपये वजा करुन भरुन घेण्याचे अधिकार पत्र देवू हा मार्ग सुचविला तर साखर कारखान्याच्या सभासद शेतकऱ्यांनी आपल्या उस बिलातून परस्पर १०० रुपये

भरण्याची तयारी दाखविली श्रीमंत शेतक-यांनी तर १०० रुपये पेक्षा जादा रक्कम भरण्याचीही तयारी दाखविली शेतकरी भरू शकणार नाहीत ही पुस्तकी शंका या शेतक-यांशी चर्चा केल्या मुळे आपोआप नाहीशी झाले.

(१३) दुसरी महत्वाची शंका या संदर्भात निर्माण होते ती शासन सगळ्या शेतक-यांच्यासाठी इतकी प्रचंड रक्कम कशी गुंतवणार? वाटतो तितका हा प्रश्नही अवघड नाही. आपल्या लोक संख्येची वार्षीक वाढ सुमारे एक कोटी वीस लाख असते यातील बालमृत्यूचे प्रमाणात २० वर्षा पर्यंत २० लाख असे धरले तर फक्त एककोटी मध्ये शेतक-यांच्या मुलाचे प्रमाण ७० टक्के म्हणजे ७० लाखाच्या दरम्यान येते. याचा अर्थ आज दर वर्षी ७० लाख लोकांना योजने मध्ये सामावून घ्यावे लागेल पहिल्या वर्षी संपूर्ण हिंदुस्थानात या योजनेखाली फक्त ७० लाख शेतकरी स्त्री पुरुष येतील म्हणजे ७० कोटी रुपये शासनाला पहिल्या वर्षात रु. गुंतवावे लागतील शासन ७० कोटी रु. गुंतविले म्हणजे काय शेतक= शेतक-यांच्या नांवावर शासनाच्या तिजोरीत ७० कोटी जमा करते पण त्याच वेळी शेतकरीही आपली ७० कोटीची वर्गणी जमा करणार ही १४० कोटी रक्कम शासन कोणत्याही उत्पादक योजने खाली गुंतवू शकते किंवा रिझर्व्ह बॅन्केकडे व्याजाने ठेवू शकते याचाच अर्थ शेतकरी शासनाला दर वर्षी ७० कोटी रुपये ३५ वर्षे वापरण्यासाठी फक्त आठ टक्के व्याजाने देते. इतकी

रक्कम शासनाला दरवर्षी मिळत असेल तर भारत सरकारला जागतीक बॅन्केकडे कर्जासाठी भिक मागण्याचे प्रसंग नजिकच्या काळात कमी होतील. याची कल्पना खालील कोष्टकावरून येईल.

| वर्ष | शासन | व्यक्ती | एकूण | ८टक्के व्याज | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७० कोटी | ७० कोटी | १४० कोटी | | |
| १० | ७०० कोटी | ७०० कोटी | १४०० कोटी | | |
| २० | १४०० कोटी | १४०० कोटी | २८०० कोटी | | |
| ३० | २१०० कोटी | २१०० कोटी | ४२०० कोटी | | |
| ३५ | २४५० कोटी | २४५० कोटी | ४९०० कोटी | | |

वरील कोष्टकात दाखविल्या प्रमाणे -

७० लाख तरूण शेतक-यांचे पहिल्या वर्षी ७० कोटी रूपये शासनाच्या खजिन्यात जमतील त्यावेळी शासनाला ही ७० कोटी त्या फंडाच्या खात्यावर ठेवावे लागतील दोघाचे मिळून वर्षा अखेर एकूण १४० कोटी रूपये रक्कम शासनाच्या खजिन्यात जमेल लोक संख्येच्या वाढीवर कधीतरी मर्यादा घालाव्या लागणारच आहेत. आजच्या वाढीचा म्हणजे वर्षाला १ कोटी २० लाखाने भर पडन्याचा वेग या पेक्षा वाढणार नाही इतकी दक्षता घ्यावी लागेल याचाच अर्थ १० वर्षांनी खजिन्यातील फंडाच्या खात्यावरील शासन व शेतक-यांची मिळून रक्कम १४०० कोटी

२० वर्षांनी २८०० कोटी ३० वर्षाने ४२०० कोटी तर ३५ वर्षांनी ही रक्कम ४९०० कोटी सात्ये होईल या सर्व रकमेवर फक्त ८ टक्के व्याज दर वर्ष मुदलात रूपांतर करीत गेले तर प्रचंड रक्कम शासनाच्याच खजिन्यात या फंडाच्या खात्यावर जमेल. आराखड्यात सांगीतल्या प्रमाणे एक शेतक-यांच्या नांवावर ३५ वर्षाला तर ४०००० पुढे रक्कम जमते याचाच अर्थ पहिल्या वर्षी सामील झालेल्या ७० लाख लोकांना ३५ व्या वर्षी प्रचंड रक्कम द्यावी लागेल. पण त्यावेळी खजिन्यात त्याच्या अनेक पटीने प्रचंड रक्कम जमलेली असेल. आपल्या देशात बचतीचे प्रमाण फार कमी आहे. याचे कारण बहुसंख्येने असणारा गरीब शेतक-यांचा वर्ग बचत योजनेत सहभागी झालेला नसतो या योजने मुळे हा सर्व वर्ग दर वर्षी वाढत्या प्रमाणात बचत योजनेत सहभागी होईल या मुळे भारतीय अर्थ व्यवस्था पूर्णपणे स्वावलंबी होईल यामुळे भारतीय अर्थ व्यवस्था स्वावलंबी होण्याच्या मार्गाने वाटचाल करू लागेल. केवळ महाराष्ट्र सरकार रोजगार हमी योजनेला दर वर्षी कोट्यावधी रक्कम खर्च करते. संजय योजनेचा खर्च दर वर्षी कोट्यावधीच्या घरात आहे. भारताचे बजेट हजारो कोटी रकमेचे असते. याचा अर्थ दर वर्षी फंडाचा आपला हिस्सा शासनाला पूर्ण करणे अवघड नांही.

योजनेचे फायदे :-

या योजनेच्या अमंलबजावणीतून अनेक जे फायदे वैयक्तीक व राष्ट्रीय स्थराव संभवतात त्याचे स्वरुप थोडक्यात असे.

[१] बचतीची उत्पादक प्रकल्पात गुंतवणूक -

जी प्रचंड बचत दर वर्षी शासनाकडे येईल तिचा उत्पादक स्वरुपातील प्रकल्पासाठी वापर करता येईल उदाहरण द्यायचे असेल तर भांडवला अभावी दप्तरात धूळ खात पडलेला " गंगा - कावेरी प्रकल्प " या फंडातून उभा करता येईल भारतीय इंजिनियर डॉ. डि. जी. दस्तूर यांनी २५ वर्षा पूर्वी या प्रकल्पाला १५०० कोटी इतका खर्च येईल असे सांगीतले होते आज दशपटीने तो वाढलेला गृहित धरला तर १५००० कोटी इतका होईल एकदम नव्हे वर्षाला ५०० कोटी या प्रमाणात खर्च केला तर ३० वर्षात गंगेचे पाणी कावेरीत आणून देश सुफलाम व सुजलाम करता येईल ही रक्कम फंडातून १४० कोटी व उरलेली शासनाने घालायची ठरविले तर या प्रकल्पाच्या उभारणीतून प्रचंड रोजगार निर्माण झाल्याने नजिकच्या ३० वर्षात बेकारीचा प्रश्न सुटेल पूर्ण होण्याचा प्रत्येक टप्प्यातून त्या प्रकल्पातून राष्ट्रीय उत्पन्नात इतके प्रचंड भर पडेल की त्यामुळे ३५ वर्षा नंतर फंडाची रक्कम दर वर्षी देणे अजीबात अशक्य नांही शिवाय

३५ वर्षा नंतरदर वर्षी जसी रक्कम द्यावी लागेल तशी दर वर्षी पुन्हा रक्कम जमत जाणारच आहे.

[२] <u>ग्रामीण विकासला गती देता येईल -</u>

"फंडाची रक्कम कोठे भराल?" या प्रश्नाचे उत्तर कांही शेतक-यांनी " गावच्या सोसायटी मध्ये भरू " असे दिले याचा अर्थ गावच्या सहकारी सोसायटया इतर बॅन्काच्या कडून भरमसाठ व्याजाने कर्ज घेवून आपल्या सभासदांना वाटतात सभासदांच्याकडून जमणा-या या ठेवीच्या निधी मुळे गांवच्या सहकारी संस्था स्वालंबी होवू शकातील कांही शेतक-यांनी तालुक्याच्या सहकारी किंवा अर्बन बॅन्का मध्ये ही ठेव ठेवावी असे सुचविले याचा अर्थ या अर्बन बॅन्कांच्या ठेवी वाढतील व त्याची पत पुरवठयाची ताकत वाढेल कांही शेतक-यांनी स्टेट बॅन्क किंवा राष्ट्रीकृत बॅन्का मध्ये या ठेवी ठेवणे अधिक सुरक्षित वाटेल याचा अर्थ या बॅन्कांना आता पर्यंत न मिळालेला हा तळातील ठेवीदारांचा वर्ग मिळेल व त्यांची पतपुरवठयाची ताकत वाढेल.

ग्रामीण शेतक-यांच्या बुध्दीला व कल्पकतेला चालना देण्यासाठी " या ठेवीच्या निधीचा वापर [redacted] कशासाठी करावा असे तुम्हाला वाटते? " हा प्रश्न विचारता त्यांच्याकडून जी उत्तरे आली त्यामुळे तळातील

शेतकरी समाज देखील कसा विधायक विचार करू शकतो याचे प्रत्यंतर आले कांही शेतक-यांनी ही रक्कम शासनाने आमच्या गांवच्या रस्ता तयार करण्यासाठी वापरावी म्हणजे आमच्या वहातूकीचा त्रास वाचेल असे सांगीतले तर कांहीनी पिण्याच्या पाण्यासाठी विहीरी खोदल्या जाव्यात असे सुचविले तर कांहीनी ओढयावर नालाबंदी पाझर तलाव तयार करण्याची कल्पना मांडली कांही जनानी नदीवर धरणे बांधण्यासाठी किंवा सिंचन योजना अंमलात आणाण्यासाठी ती रक्कम उपयोगात आणावी असे सुचविले तर कांही शेतक-यांनी गावाला शाळा किंवा कारखान्याची इमारत बांधण्यासाठी ही रक्कम वापरावी असे मत दिले या सर्वांचा अर्थ असा की शेतक-यांच्या बचत ठेवीतून जी रक्कम शासनाच्या खजिन्यात जमते त्याची नियोजन पूर्वक गुंतवणूक केली तर ग्रामीण विकासाला विलक्षण गती देता येईल. पैशा अभावी ग्रामीण विकासाच्या योजना मुदतबंद पद्धतीने पूर्ण करता येत नांही त्यामुळे विकासाची उद्दीष्ठे सफल होत नांहीत. शिवाय योजनांच्या वाढतात व फायद्या पेक्षा तोटेच जास्त होतात अशा वेळी हा फंड शासनाला व समाजाला वरदान ठरणार आहे.

[३] <u>वृध्द शेतक-यांना वरदान -</u>

भविष्य निर्वाह निधीची योजना ग्रामीण शेतक-यांना

BALASAHEB ... SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

वरदान ठरणार आहे. वयाच्या ५५ व्या वर्षी ४०६६२.७६ इतकी रक्कम हातात आल्या नंतर त्याचे उर्वरित आयुष्य सुखासमाधानात जाणार आहे. ही रक्कम त्याने सरळ १२ टक्के व्याजाने बँन्केत ठेवली तरी वर्षाला ५००० रूपये मिळणा-या व्याजात त्याचे भागेल आणि शेवटी त्याच्या वारसाला हीरक्कम वारसा हक्काने मिळाल्याने कर्जाचा वारसा मुलाच्या डोक्यावर ठेवून मरण्याची भारतीय शेतक-यांची परंपरा खंडीत होईल वृध्द शेतकरी समाजाचा अभ्यास करीत असतांना आणखी एक मुददा आम्हाला जाणवला तो म्हणजे ज्या शेतक-याने सर्व जमीन आपल्याच नांवावर ठेवण्याचा किंवा रोखीने पैसे अपल्या नांवावर शिल्लक ठेवण्याचा चाणाक्षपणा दाखविला त्याला इतराकडून छळण्याचे प्रमाण कमी त्याची मान लंडक्ना कमी प्रमाणात आढळते गावात किंवा घरात दबदबा असतो याचाच अर्थ त्या शेतक्याला ५५ व्या वर्षी अर्ध्या लाखा पर्यंत रक्कम मिळण्याची शाश्वती असते आणि ती खर्च करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य त्याला असते. इतर स्थावर जंगम प्रॉपर्टी प्रमाणे मुलांना त्या रकमेवर अधिकार त्या व्यक्तीच्या हयातीत प्राप्त होत नांही. त्या शेतक-याला गावात व घरात मान मान्यता मिळणारच व त्याचे आयुष्य समाधानात जाणाराच शेवटची शाश्वती प्राप्त झाल्याने संपूर्ण आयुष्य तो निर्धास्त पणे जगेल म्हणून ही योजना शेतक-यांना मुक्ती योजना ठरेल.

